सकाळ कोल्हापूर, गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे गणेशमूर्ती, निर्माल्य संकलन

कोल्हापूर ता. ३ : येथील विवेकानंद महाविद्यालयातील ज्युनिअर व सीनिअर एनएसएस विभागातर्फे कसबा बावडा येथील पंचगंगा नदी घाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन केले. विसर्जनप्रसंगी नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांनी निर्माल्याचे संकलन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा.संदीप पाटील, प्रा.पी.आर.बागडे प्रा. ए. आर. धस, प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. एल. ई. नरोन्हा यांनी संयोजन केले.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे गणेशमूर्ती संकलन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर एनएसएस विभागामार्फत कसबा बावडा येथील पंचगंगा नदी घाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करण्यात आले. घरगुती गणपती विसर्जनप्रसंगी नदीचे पाणी प्रदूषण व पर्यावरण हानी टाळण्यासाठी विवेकानंद कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. विवेकानंद कॉलेजच्या मूर्तिदान आवाहनास कसबा बावड्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी संकलित केलेल्या मूर्ती महानगरपालिका प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या.

तरुण भारत संवाद
गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे गणेशमूर्ती, निर्माल्य संकलन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागामार्फत बावड्यातील पंचगंगा नदी घाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य् संकलन करण्यात आले. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शंकलित मूर्ती महानगरपालिकाकडे सुपुर्द केल्या. या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली केलें. यावेळी प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे प्रा. ए. आर. धस, प्रा. एस. पी. वेदांते, प्रा एल. ई. नरोन्हा यांनी केले.